B.com

B.com

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ :
अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमध्ये
नवीन अभ्यासक्रम/विषयांना मान्यता
देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन आदेश क्रमांक : एनजीसी २०१६/(१०२/१६)/मशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक: ०९ सप्टेंबर, २०१६.

संदर्भ: १. शासन निर्णय क्र. एनजीसी २०१०/(१९३/१०)/मशि-४,
दि. ३०.१०.२०१०.
२. शासन निर्णय क्र. एनजीसी २०१२/(२४७/१२)/मशि-४,
दि. ०२.०९.२०१३.

## शासन आदेश

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कलम ८२ व ८३ अणि संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या कार्यपद्धतीनुसार राज्यातील अकृषि विद्यापीठांनी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठी नवीन अभ्यासक्रम/विषयांचे प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे सादर केले आहेत. सदर प्रस्तावांची शासन निर्णय एनजीसी २०१२/(२४७/१२)/मशि-४, दि. २ सप्टेंबर २०१३ अन्वये छाननी करण्यात आली. विद्यापीठांच्या शिफारशींच्या अनुषंगाने शासन स्तरावर केलेली छाननी वा महाविद्यालयांनी नॅक मुल्यांकनासाठी केलेला अर्ज व त्याअनुषंगाने प्राप्त LOI (Letter of Intention) विचारात घेऊन पात्र ठरलेल्या प्रस्तावांना महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कलम ८२(५) अन्वये शासनास प्राप्त अधिकारानुसार तसेच काही महाविद्यालयांनी केलेली त्रुटींची पूर्तता लक्षात घेऊन महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कलम ८२ (५) मधील परंतुकानुसार शासनास असलेल्या अधिकारांचा वापर करुन अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात पुढील विवरणात नमूद केल्यानुसार नवीन अभ्यासक्रम/विषयांना खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून **कायम विना अनुदान तत्वावर** मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे/महाविद्यालयांचे नांव व पत्ता | अभ्यासक्रम/विषय |
|---|---|---|
| १. | २. | ३. |
| मुंबई विद्यापीठ, मुंबई | | |
| १. | श्री. विलेपार्ले केलवानी मंडळाचे उषा प्रविण गांधी कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, भक्तीवेदांता स्वामी मार्ग, जुहू स्कीम, विलेपार्ले (प.) | एम. ए. एन्टरटेन्मेंट, मिडीया अॅन्ड अॅडर्व्हटायझींग |